**L. A. BILL No. VIII OF 2024.**

A BILL

TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES AND PURPOSES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2024-2025.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८.**

**राज्याच्या एकत्रित निधीतून २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाच्या काही भागातील सेवांकरिता व प्रयोजनांसाठी विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्याच्या एकत्रित निधीतून २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाच्या काही भागातील सेवांकरिता व प्रयोजनांसाठी विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून रुपये २१,९९,३२,९३,०२,००० काढणे.

**२.** राज्याच्या एकत्रित निधीतून, दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षात या अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सेवा व प्रयोजने यांच्या बाबतीतील कित्येक खर्च भागविण्यासाठी रकमा देतेवेळी यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमांपेक्षा अधिक नसतील इतक्या म्हणजे दोन लाख एकोणीस हजार नऊशे बत्तीस कोटी, त्र्याण्णव लाख दोन हजार रुपये एवढी एकूण बेरीज होणाऱ्या रकमा देण्यात येतील व त्यांचा विनियोग करता येईल.

विनियोजन.

**३.** या अधिनियमाद्वारे, राज्याच्या एकत्रित निधीतून ज्या रकमा देण्यासाठी व त्यांचा विनियोग करण्यासाठी अधिकृत मंजुरी देण्यात आलेली आहे त्या रकमांचा विनियोग, दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षात अनुसूचीत दर्शविलेल्या सेवा व प्रयोजने यांकरिता करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८. ]**

**[ राज्याच्या एकत्रित निधीतून २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाच्या काही भागातील सेवांकरिता व प्रयोजनांसाठी विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[ श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री. **]**

**[विधानसभेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.